RNI No. MAHBIL /2009/31733

# महाराष्ट्र शासन राजपत्र

## असाधारण भाग चार–अ

वर्ष ४, अंक १९५] शुक्रवार, ऑक्टोबर ५, २०१८/आश्विन १३, शके १९४० [पृष्ठे २, किंमत : रुपये १५.००

### असाधारण क्रमांक १९५

### प्राधिकृत प्रकाशन

**महाराष्ट्र शासनाने केंद्रीय अधिनियमांन्वये तयार केलेले (भाग एक, एक-अ आणि एक-ल यांमध्ये प्रसिद्ध केलेले नियम व आदेश यांव्यतिरिक्त) नियम व आदेश.**

**अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभाग**

मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरू चौक

मंत्रालय, मुंबई ४०० ०३२, दिनांक ५ ऑक्टोबर २०१८

### अधिसूचना

वैधमापन शास्त्र अधिनियम, २००९.

क्रमांक वैमाशा. २०१८/४२२/प्र.क्र.१२०/ग्रासं-३.— वैधमापन शास्त्र अधिनियम, २००९ (२०१० चा १) च्या कलम ५३ च्या पोट-कलम (१) व (२) याद्वारे प्रदान करण्यात आलेल्या अधिकारांचा आणि या संबंधात महाराष्ट्र शासनास समर्थ करणाऱ्या इतर सर्व अधिकारांचा वापर करून उक्त अधिनियमातील कलम ५३ च्या पोट-कलम (१) मधील तरतुदीनुसार केंद्र शासनाशी पूर्वविचार विनिमय केल्यानंतर याद्वारे महाराष्ट्र वैधमापन शास्त्र (अंमलबजावणी) नियम, २०११ मध्ये खालीलप्रमाणे सुधारणा करीत आहे. सर्व संबंधितांना माहितीसाठी व त्यांच्याकडून काही हरकती व सूचना असल्यास त्या विचारात घेऊन सदरचे प्रारूप मसुदा दिनांक ५ ऑक्टोबर २०१८ रोजी किंवा तद्नंतर विचारात घेण्यासाठी कलम ५३ च्या पोट-कलम (४) अन्वये आवश्यक असलेप्रमाणे महाराष्ट्र शासन प्रसिद्ध करीत आहे.

उपरोक्त मसुद्यासंदर्भात कोणत्याही व्यक्तीकडून ज्या कोणत्याही हरकती किंवा सूचना सदर अधिसूचना शासन राजपत्रात प्रसिद्ध झाल्यापासून १५ दिवसांचे आत प्रधान सचिव, अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभाग, विस्तार इमारत, मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरू चौक, मंत्रालय, मुंबई ४०० ०३२ यांना प्राप्त होतील त्या शासन विचारात घेईल.

### प्रारूप नियम

(१) या नियमांना "महाराष्ट्र वैधमापन शास्त्र (अंमलबजावणी) (दुसरी सुधारणा) नियम, २०१८" असे म्हणण्यात येईल.

(२) महाराष्ट्र वैधमापन शास्त्र (अंमलबजावणी) नियम, २०११ मधील अनुसूची एक च्या तक्त्यामध्ये अनुक्रमांक २९ नंतर अनुक्रमांक ३० खालीलप्रमाणे समाविष्ट करण्यात येत आहे :–

| (१) | (२) | (३) |
|---|---|---|
| "३० | दूध | घनफळ व वजन" |

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

**महेश पाठक,**
शासनाचे प्रधान सचिव.